**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१
barti
दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

जा.क्र.बार्टी/योजना विभाग/jee-neet/वेळापत्रक/२०२६-२७/ ५९४४ दिनांक:-२० /०८ /२०२६

## घोषणापत्र

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे मार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील (मातंग व इतर तत्सम मांग, मातंग मिनिमादिग, दखनी- मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग गारोडी. मांग गारुडी, मादगी व मादिगा या जाती वगळून) उमेदवारांना बार्टी मार्फत जेईई (JEE) व नीट (NEET) परीक्षेचे पूर्व प्रशिक्षण देण्यात येत आहे. त्याअनुषंगाने पुणे, मुंबई, नाशिक, छ. संभाजीनगर, लातूर, अमरावती व नागपूर या विभागावार ठिकाणी प्रत्येकी जेईई (JEE) प्रशिक्षणासाठी ७५ व नीट (NEET) प्रशिक्षणासाठी ७५ विद्यार्थ्यांची निवड करण्याकरिता बार्टी मार्फत दि. १४/०५/२०२६ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. सदर जाहिरातीद्वारे दिनांक ३०/०६/२०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्याबाबत नमूद करण्यात आले होते. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांच्या प्राप्त ऑनलाईन माहितीच्या आधारे बार्टी मार्फत पुणे, मुंबई, नाशिक, छ. संभाजीनगर, लातूर, अमरावती व नागपूर या ठिकाणासाठी जेईई (JEE) व नीट (NEET) करिता तात्पुरती निवड यादी व प्रतीक्षा यादी दिनांक ०७/०८/२०२६ रोजी बार्टी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. प्रसिद्ध करण्यात आलेल्या तात्पुरत्या निवड व प्रतीक्षा यादीतील पुणे, मुंबई, नाशिक, छ. संभाजीनगर, लातूर, अमरावती व नागपूर या ७ विभागातील निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या मुळ कागदपत्रांची तपासणी दि.१७/०८/२०२६ ते दि.२२/०८/२०२६ या कालावधीत बार्टी येरवडा संकुल, 4, कॉमरझोन आयटी पार्क, अंतर्गत रोड, जेल रोड, येरवडा पुणे, ४११००६ येथे सकाळी १०.३० वाजले पासून करण्यात येत आहे. या कालावधीत जे विद्यार्थी मुळ कागदपत्रांची तपासणी करिता गैरहजर असतील अशा विद्यार्थ्यांसाठी पुन:श्च एकदा कागदपत्रांची तपासणी करण्याकरिता मुदतवाढ देण्यात येत आहे. **उर्वरित राहिलेल्या विद्यार्थ्यांनी दि. २४ व २५ ऑगस्ट, २०२६ रोजी मुळ कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), २८, क्वीन्स गार्डन, कॅम्प पुणे ४११००१ येथे सकाळी १०.३० वाजलेपासून उपस्थित राहावे.**

स्वाक्षरी/-
(दीपा मुधोळ- मुंडे)
**महासंचालक**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**